RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–क

वर्ष १, अंक २८] मंगळवार, ऑगस्ट ४, २०१५/श्रावण १३, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य**

वन भवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१, दिनांक २४ जुलै २०१५

**आदेश**

**वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२.**

क्रमांक कक्ष-२३(४)/६९ (२०१४-१५)/१६३३.—वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ च्या अधिनियम ५३) याच्या कलम ५ च्या पोट-कलम (२) अन्वये मुख्य वन्यजीव रक्षक यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य हे शासन, महसुल व वन विभाग पत्र क्रमांक डब्ल्युएलपी-०८१४/प्र.क्र. १८६/फ-१, दिनांक २१ जुलै २०१५ या अन्वये दिलेल्या राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, याद्वारे खालीलप्रमाणे अनुसूची स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, शासन अधिसूचना, महसुल व वन विभाग क्रमांक डब्ल्युएलपी-०६१३/प्र.क्र. १९९/फ-१, दिनांक २१ जुलै २०१३ या अन्वये नियुक्त केलेल्या व स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वन्यजीव रक्षकाकडे, त्याच्या संबंधीत क्षेत्रीय अधिकारीतेनुसार या अधिनियमाखालील त्यांचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे सोपवित आहे :—

| अ. क्र. (१) | वन्यजीव रक्षक (२) | कलम (३) |
|---|---|---|
| १ | वनपरिक्षेत्र अधिकारी | कलम ३९ (३) केवळ कलम ११ (बी) अन्वये दिलेल्या परवान्यानुसार पारध केलेल्या रोही (Boselaphus tragocamelus) व रानडुक्कर (Sus scrofa) करिता |

**स्पष्टीकरण.**—(१) वरील अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमुद केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये, वन विभागाच्या प्रादेशिक व वन्यजीव या दोन्ही शाखांमधील अधिकाऱ्यांचा समावेश असेल उदा. वन परिक्षेत्र अधिकारी यामध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) यांचा समावेश आहे.

(२) या आदेशाद्वारे ज्यांचे अधिक्रमण करण्यात आले आहे अशा आदेशांनुसार, कोणत्याही अधिकाऱ्याने केलेल्या कायदेशीर कार्यवाहीचा परिणाम म्हणून जी कार्यवाही चालू असेल अशा कोणत्याही कार्यवाहीवर या आदेशातील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा पोहचणार नाही किंवा ती कार्यवाही संकोच पावणार नाही.

**सर्जन भगत,**
मुख्य वन्यजीव रक्षक तथा
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य.

## CHIEF WILDLIFE WARDEN, MAHARASHTRA STATE

Van Bhavan, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440 001
dated the 24th July 2015

### Order

WILDLIFE (PROTECTION) ACT, 1972.

No. Desk-23(4)/C.No. 69 (2014-15)/1633.—In exercise of the powers conferred by sub-section *(2)* of section 5 of Wildlife (Protection) Act, 1972 (No. 53 of 1972), the Chief Wildlife Warden, Maharashtra State, with the previous approval of the State Government accorded *vide* Revenue and Forest Department Government letter no. WLP-0814/CR. No. 186/F-1, dated 21st July 2015 hereby delegate his powers and duties under this Act, as specified in column (3) of the schedule appended hereto the Wildlife Warden appointed under Government Notification Revenue and Forest Department No. WLP-0613/CR. No. 199/F-1, dated 21st July 2013 specified in column (2) for their respective territorial jurisdiction.

| Sr. No. (1) | Wildlife Warden (2) | Section (3) |
|---|---|---|
| 1 | Range Forest Officer | Section 39 (3) Only in respect to Rohee (*Boselaphus tragocamelus*) and Wild pig (*Sus scrofa*) hunted under permit issued *vide* section11*(b)* |

*Explanation.*—(1) Officers mentioned in column (2) in the schedule above will include the officers of both the Territorial and Wildlife Wings of the Forest Department, e.g. Range Forest Officer includes Range Forest Officer (Wildlife).

(2) Nothing in this order shall affect or abridge any proceeding which is in progress as a consequence of lawful actions taken by any officer in accordance with the order which are superseded by this order.

SARJAN BHAGAT,
Chief Wildlife Warden and
Principal Chief Conservator of
Forests (Wildlife), Maharashtra State.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

/

# परिशिष्ठ-१

## रानडुक्कर / रोही पारध परवाना

वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालय

क्रमांक

दिनांक

मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी आदेश क्रमांक कक्ष-२३(४)/प्र.क्र.४९४/१६०३, दिनांक २६.०७.२०१३ अन्वये वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११ (१) (ख) चे रानडुक्कर/रोहीचे बावद दिलेले अधिकाराचा वापर करुन सदरचे प्राणी हे परवान्यात दिलेल्या विशिष्ठ क्षेत्रासाठी शेतात उभ्या पिकासाठी किंवा मानवी मालमत्तेला धोकादायक ठरले आहे याची खात्री झाली आहे. म्हणुन खालील तपशील दिल्यानुसार या आदेशाव्दारे सदरचे रानडुक्कर/रोही समुह पारध करण्याची/करुन घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

परवाना देण्यात आलेल्याचे नांव व पत्ता :---------------------------------------------

---------------------------------------------------

------------------------------------------

ज्या ठिकाणासाठी परवाना देण्यात आला :- सर्व्हे क्र.----------------मौजा----------------------
त्याचा तपशील तालुका-----------------जिल्हा---------------------

वन्यप्राणी/वन्यप्राणी समुहाची जात :- रानडुक्कर / रोही

पारध करावयाच्या प्राण्यांची संख्या :------------------------------------------

परवान्याची मुदत :- दिनांक-----------पासुन---------------पर्यंत (किंवा दिलेली संख्या पारध होईपर्यंत जे अगोदर येईल तोपर्यंत)

सदर परवानगी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन देण्यात येत आहे.

१. ज्या गट/सर्वे क्रमांक करिता पारध करण्याची परवानगी दिली आहे त्याच गट/सर्वे क्रमांक मध्ये रानडुक्कर/रोही पारध केले जाईल. रानडुक्कर/रोही याचा पाठलाग करुन इतर क्षेत्रात/लागुन असलेल्या जंगलात पारध करण्यात येऊ नये.
२. परवाना हस्तांतरणीय राहणार नाही.
३. परवानाधारक अन्य कोणत्याही वन्यप्राण्याची शिकार करणार नाही किंवा चुकीनेसुध्दा इतर वन्यप्राण्यांची शिकार होणार नाही याची दक्षता घेतील. जर परवानाधारकाने अन्य वन्यप्राण्याची शिकार केल्यास किंवा त्याच्या चुकीमुळे इतर वन्यप्राण्याची शिकार झाल्यास त्यांचे विरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत कार्यवाही केली जाईल.
४. रानडुक्कर/रोही पारध झाल्यानंतर जागेवरच त्यांचे छायाचित्र काढुन ठेवावे व नंतर ते छायाचित्र या कार्यालयाला स्वाक्षरीनिशी सादर करावे.
५. पारध केलेल्या रानडुक्कर/रोही हे शासनाची संपत्ती होईल. सदर पारध रानडुक्कर/रोही हे मला कलम ३९(३) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार आपल्याला देण्यात येत असुन आपण आपले स्तरावर त्याची विल्हेवाट लावावी मात्र सदर पारध रानडुक्कर/रोही आपल्याला कोणालाही हस्तांतरीत करता येणार नाही, त्याचा व्यापार करता येणार नाही किंवा त्याचे मृगयाचिन्ह बनवून ठेवता येणार नाही तसे केल्यास तो गुन्हा ठरेल.
६. पारध, रानडुक्कर/रोही हया प्राण्याची विल्हेवाट लावल्यानंतर ती कशा प्रकारे लावली याबाबत कार्यरत असलेले वनरक्षक/वनपाल यांचे मार्फत लेखी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

वनपरिक्षेत्र अधिकारी
--------------परिक्षेत्र

प्रतिलीपी :- उप वनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी/उप विभागीय वन अधिकारी-----------यांना सादर.
प्रतिलीपी :- क्षेत्र सहायक,------------------यांना माहिती व योग्य कार्यवाहीस अग्रेषीत.
प्रतिलीपी :- नियत क्षेत्र रक्षक--------------- यांना माहिती व योग्य कार्यवाहीस अग्रेषीत.

# परिशिष्ठ-२

## कलम ११ (१) (ख) अन्वये रानडुक्कर/रोही पारध करण्यासाठी दिलेल्या परवान्याचा मासीक अहवाल

(माहे-------------/--------)

| अ.क्र. | परवान्यासाठी अर्ज केलेल्या व्यक्तीचे नांव व पत्ता | २४ तासांच्या आंत परवाना दिला काय? असल्यास क्र. व दिनांक | २४ तासाचे आंत परवाना नाकारला काय? | २४ तासात निर्णय न दिल्याने परवाना गृहीत धरला गेला काय? | परवाना दिला असल्यास प्राण्यांची संख्या | | परवान्याची मुदत | परवान्यानुसार /गृहीत परवान्यानुसार पारध केलेले प्राण्यांचा तपशील | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | जात | संख्या | | जात | संख्या | पारध केल्याचा दिनांक | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

टिप :- या प्रपत्रात त्या महिन्यात दिलेल्या /नाकारलेल्या परवाना किंवा गृहीत धरलेल्या परवान्याचा तपशील नमुद करावा. मागील महिन्यातील परवान्याबाबत उल्लेख करु नये.

परिशिष्ठ-३

## चालु महिन्यात कलम ११ (१) (ख) अन्वये पारध झालेल्या रानडुक्कर/रोहीबाबत मासीक अहवाल

(माहे-------------/--------)

| अ क्र | अर्जदाराचे नांव | परवाना दिलेला किंवा गृहीत धरलेला | परवाना दिलेल्या प्राण्याचा तपशील | | प्रत्यक्षात पारध केलेल्या प्राण्यांचा तपशील | | | पारध केलेल्या ठिकाणाचा तपशील | पारध करण्यासाठी वापरलेली पध्दत | विल्हेवाट लावल्याचा तपशील | वपअ यांचे चिकीत्सक अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | जात | संख्या | जात | लिंग | संख्या | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

टिप :- या प्रपत्रात चालु महिन्यात प्रत्यक्ष पारध झालेल्या प्राण्याचा तपशील असावा. मागील महिन्यात परवाना दिला / गृहीत धरला परंतु या महिन्यात पारध झाला असला तरी त्याचा तपशील सदर प्रपत्रात येईल.